**//शीलं परम् भूषणम्//**

**श्री अचार्यारात्न देशाभूषण शिक्षण प्रसारक मंडळ संचालित**

# महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

## समाजशास्त्र विभाग

# अनोखा व्हॅलेंटाईन डे

## शुक्रवार १४ फेब्रुवारी २०२५

शुक्रवार १४ फेब्रुवारी २०२५ रोजी महावीर महाविद्यालय, कोल्हापूर व रामभाऊ परुळेकर बहुद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सावली केअर सेंटर, कोल्हापूर येथे व्हॅलेंटाईन डे निमित्त संगीत संध्या या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक कॅप्टन उमेश वांगदरे व मराठी विभागातील प्राध्यापिका श्वेता परोळेकर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. सदर कार्यक्रमात प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी मराठी-हिंदी चित्रपट गीते, भावगीते, भक्तिगीते गाऊन सावली केअर सेंटरमधील विशेष व्यक्तींचे मनोरंजन केले. तरुण पिढीला सामाजिक जाणीव निर्माण व्हावी व त्यांच्या भावनांना योग्य वळण लागावे या हेतूने सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.




GPS Map Camera
Kolhapur, Maharashtra, India
Plot No :51/2 Pirachi Wadi, Radhanagari Rd, Puikhadi, Kolhapur, Wadipir, Maharashtra 416001, India
Lat 16.65761° Long 74.192147°
14/02/25 05:43 PM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Google
Panchgani, Maharashtra, India
Wq9w+hp5, Shivaji Nagar Rd, Shivajinagar, Panchgani,
Maharashtra 412805, India
Lat 17.91868° Long 73.796682°
14/02/25 05:42 PM GMT +05:30

१३/०३/२०२५

मेरीड इंडिया संचलित,

# सावली केअर सेंटर

प्लॉट नं ५१/२,राधानगरी रोड,पिरवाडी कोल्हापूर.
मो - ८४११९३७५५५ / ९५४५५१९९५१



प्रिय सुहृद,

घरातील शारीरिक अथवा मानसिक व्याधीमुळे परावलंबित्व असलेल्या आप्तांच्या सेवेसाठी सुरु केलेला सावली केअर सेंटर हा प्रकल्प आपल्या सहकार्याने आणि सहाय्याने उतरोत्तर वृधींगत होत आहे. नुकतीच संस्थेने २० वर्ष पूर्ण केलेली आहेत.

या २० वर्षांमध्ये संस्थेस ४५०० रुग्णांची सेवा करण्याचे भाग्य लाभले. संस्थेच्या धोरणाप्रमाणे यारुग्णांमधील ३५% रुग्ण हे गरीब / अनाथ / बेवारस वर्गातील असून त्यांची सेवा संस्थेने मोफत / सवलतीचा दरात केली आहे. या कालावधीमध्ये संस्थेने सजीव अभियान, भिकारीमुक्त कोल्हापूर, मातुल, सेल्फ रिलायंस, द ब्रिज, सावली सोशल सर्कल, सावली सुदृढ गाव योजना इत्यादी लोकोपयोगी उपक्रम राबवले जात आहेत.

महाराष्ट्राला अभिमान वाटावा अशा या संस्थेत आपला सक्रिय सहभाग असावा, ही विनंती.

आपला,
किशोर देशपांडे